साप्ताहिक
अखिल जनलोक संपादक व पत्रकार संघाचे निर्भय, निर्भिड
# जनलोक वार्ता
RNI NO. : MAHMAR/2021/81703 मुख्य संपादक : श्री. राजू शिंगाडे राजगुरूनगर खेड आवृत्ती

२२/९/२४ खेड जनलोक आवृत्ती संपादक लतिफ शेख

# खेड तालुक्यातील कुरकुंडी हे गाव ठरले प्रथम कृत्रिम हौदात गणेशमूर्ती विसर्जनाचा केला उपक्रम

## सरपंच गणेश हनुमंत काळे यांचे सहकार्य



रॉयल गर्ल्स क्लब ने कृत्रिम हौदात गणेश मूर्ती विसर्जनाचा केला उपक्रम

कुरकुंडी दि.२२

खेड तालुक्यातील कुरकुंडी गावामध्ये 175 गणेश मूर्ती कृत्रिम हौदात विसर्जित करण्यात आल्या. खेड तालुक्यातील कुरकुंडी हे गांव पहिलेच असेल ज्यांनी कृतीम हौदात गणपती विसर्जन करण्याची प्रथा सुरू केली आहे. हे सर्व शक्य झाले Royal Girls Clubs च्या मुलींच्या जागरुती मुळे. या कृतीम पुढील वर्षात आम्ही अधिक जोमाने या उपक्रमात भाग घेऊ असे मत सरपंच गणेश हनुमंत काळे यांनी व्यक्त केले.

Royal Girls Club हा गेल्या दोन वर्षापासून कुरकुंडी गावासाठी अनेक विधायक कामे करत आहे. गणपती उत्सवाच्या वेळी गावातील 7 सार्वजनिक मंडळाकडील निर्माल्य जमा करून त्याचे खत तयार करणे, गावात पर्यावरणावर जनजागृती करून मुलीनी गावकऱ्यांना नदीत निर्माल्य आणि मूर्ती विसर्जित करू नका असे आवाहन केले. या नवीन विचारायला प्रतिसाद देऊन गावाचे सरपंच गणेश हनुमंत काळे आणि गावकऱ्यांनी उस्फूर्त पणे 175 मूर्ती कृतीम हौदात विसर्जित केल्या तसेच स्थानिक मूर्तिकाराला दान केल्या.

Girls Club सदस्या प्रांजल संतोष पिसाळ, गायत्री उमेश जावळे, मानसी नामदेव जामदार, पायल शंकर ढोरे, ऋतुजा रामदास भोकसे, रेणुका संतोष पिसाळ, पायल नितीन सुर्वे, सारिका साईनाथ म्हसे, आदिती उमेश जावळे, यशस्वी भगवान घोडगे, व प्रतीक्षा कैलास काळे यांचे व "किशोरी सखी" आणि संस्थेच्या fellow सारिका भोसले आणि माया जावळे तसेच टीम लीडर अर्चना तळेकर यांचे हार्दिक अभिनंदन. सरपंच गणेश काळे यांचा आदर्श सर्व गणेश भक्त मंडळांनी घ्यावा अशा प्रकारची चर्चा भाविक भक्तांमधून होत आहे.